**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १० एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. महावीर जयंती सर्वत्र उत्साहाने साजरी, नागपुरात भव्य शोभायात्रेसह अनेक कार्यक्रम आयोजित.
2. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मध्य रेल्वेची पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात चांगली कामगिरी, नागपूर विभागात अनेक विकासकार्य प्रगतीपथावर.
3. नागपूर जिल्ह्यात वर्षभरात वीजचोरीचे 1 हजार 225 प्रकरणं उघडकीस.
4. अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे होणाऱ्या २०२८ च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार.

----------------------------------------------------

**भगवान महावीर जयंती**

जैन धर्माचे २४वे तीर्थंकर, भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत असून, यानिमित्त ठिकठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्यात. भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या, बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या, कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांचं जन्म, कल्याणक पर्व सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती, समृद्धी घेऊन येवो, त्यांचं जीवन समाजाला सदैव प्रेरणा देत राहो, असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांचा जयंती महोत्सव नागपुरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून, श्रीदिगंबर जैन परिवार मंदिर ट्रस्ट आणि सकल जैन समाजाच्या संयुक्त विद्यमानं आज सकाळी इतवारी इथल्या दिगंबर जैन परिवार मंदिर इथून निर्यापक श्रमण वीरसागरजी महाराज संघ आणि निष्काम-मती माताजी संघ यांच्या उपस्थितीत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत १२१ फूट उंचीचा भव्य ध्वज आणि आकर्षक चित्ररथांचा समावेश होता. शोभायात्रा मार्गावर जागोजागी पुष्पवर्षाव करण्यात आला. विविध ठिकाणी मिरवणुकीचं स्वागत करण्यात आलं याशिवाय, विविध संघटनांकडून प्रसाद ही वितरित करण्यात आला. अकोला शहरात जैन

समाजाच्या वतीनं मिरवणुक काढण्यात आली. या शोभायात्रेची सुरुवात, अकोल्यातल्या प्राचीन जैन मंदिरापासून, ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात झाली.

-----------------------------------------------------

वस्तू आणि सेवा क्षेत्रातली निर्यात

देशाची चालू आर्थिक वर्षातली वस्तू आणि सेवा क्षेत्रातली निर्यात, ८२० अब्ज डॉलरवर गेली आहे. ही निर्यात गेल्या वर्षीच्या, याच कालावधीतल्या, ७७८ अब्ज डॉलरपेक्षा, ६ टक्के अधिक असल्याचं, वाणिज्य मंत्रालयानं सांगितलं. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत झालेल्या निर्यात प्रोत्साहन परिषद आणि उद्योजकाच्या बैठकीत ही आकडेवारी समोर आली आहे.

-----------------------------------------------------

नरेंद्र मान

गृह मंत्रालयानं २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी, तहव्वुर राणा प्रकरणात, नरेंद्र मान यांची तीन वर्षांसाठी विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं राणाच्या प्रत्यार्पणासाठीचा अंतिम अर्ज फेटाळल्यानंतर, त्याला भारतात आणलं जात आहे. या घटनेमुळे हल्ल्यातल्या न्याय प्रक्रियेला नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान राणाच्या प्रत्यार्पण विषयी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे

*ये मोदी जी का दृढ़ संकल्प था कि जिन लोगों ने हमारे देश पर आंख उठाई उनको सख्त से सख्त सजा मिले और आज हर भारतवासी को गर्व है मोदी जी पर, विशेषकर हम सब मुंबईकर कृतज्ञ हैं मोदी जी के कि ऐसे लोग जिन्होंने हमारे देश के ऊपर हिंसक हमला किया था, उनको हम भारत के धरती पर भारत के कानून के अंतर्गत सजा दिलाएंगे। आतंकवादियों के खिलाफ हमारी सरकार का बड़ा कड़ा रवैया है और हम किसी को भारत की धरती पर आंच नहीं डालने देंगे। मुंहतोड़ जवाब आतंकवादी घटनाओं पर.*

-----------------------------------------------------

वक्फ

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर पुढच्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती के.व्ही.विश्वनाथन यांच्या पीठासमोर,

१६ एप्रिल रोजी ही सुनावणी होईल. या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका न्यायालयात दाखल झाल्या आहेत.

-----------------------------------------------------

मध्य रेल्वे

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, मध्य रेल्वेनं पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. १४ स्थानकांवर नवीन पादचारी पूल बांधण्यात आले, यात नागपूर विभागात तीगांव, पांढुर्णा, भरतवाड़ा इथला पूलांचा समावेश आहे. स्टेशन विकास कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर आणि अजनी इथं मोठ्या प्रमाणात पुनर्विकासाचे काम सुरू आहे. ट्रॅक पायाभूत सुविधांची वाढ देखील करण्यात आला असून बुटीबोरी-उमरेड ३१ किलोमीटरची गती ५० ते ७५ किलोमीटर प्रतितासनं वाढवली आहे तर बडनेरा-अमरावती, ९.०० किमी ची गती ९० ते ११० किमी प्रतितासनं वाढविण्यात आली आहे. या घडामोडींमुळे प्रवासी आणि मालवाहतूक या दोन्हीसाठी सुरक्षित, जलद आणि अधिक कार्यक्षम रेल्वे नेटवर्क तयार करण्याच्या दिशेनं मध्य रेल्वेच्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे.

-----------------------------------------------------

महावितरण

नागपूर जिल्ह्यात, महावितरणनं केलेल्या धडक कारवाईत, गेल्या आर्थिक वर्षात, वीजचोरीचे तब्बल चार हजार १९६ गंभीर प्रकार उघडकीस आलेत. या चोरीमुळे महावितरणला, सुमारे सात कोटी १९ लाख ५४ हजार रुपयांच्या, ३८ लाख ३९ हजार ७२८ युनिट विजेचं नुकसान झालं. याव्यतिरिक्त, प्रत्यक्ष गरजे व्यतिरिक्त इतर कारणांसाठी किंवा अप्रत्यक्षपणे वीज वापरणाऱ्या, ३०२ ग्राहकांवरही कठोर कारवाई करण्यात आली तर १७१ वीज चोरट्यां विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. आकडेवारी नुसार वीजचोरी करणाऱ्यांमध्ये, तारांवर आकडा टाकून वीज चोरणाऱ्या, दोन हजार ३४५ ग्राहकांचा समावेश आहे. प्रत्यक्ष वापरा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी किंवा अप्रत्यक्ष वीज वापरणाऱ्या, ३०२ ग्राहकांनी तीन लाख १३२ युनिट विजेचा अनधिकृत वापर केला. ज्यासाठी त्यांना, ८३ लाख ४४ हजार रुपयांचे देयक आकारण्यात आले आहे.

-----------------------------------------------------

पत्र परिषद

गोंदिया-बल्लारशा वाढीव रेल्वेलाईन प्रकल्पाबाबत माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वेमंत्री, अश्विनी वैष्णव हे उद्या माध्यम

प्रतिनिधींशी दूरदृश्य प्रणाली द्वारे, संवाद साधणार आहेत. दुपारी पाऊन वाजता पत्र परिषद होणार असून, त्यात गडचिरोली तसंच इतर जिल्ह्यातील पत्रकार सहभागी होणार आहेत.

---------------------------------------------------

डॉ. पंजाबराव देशमुख पुण्यतिथी

स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री, डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची आज ६०वी पुण्यतिथी. त्यानिमित्तानं अमरावती इथल्या त्याच्या स्मृतिस्थळावरील डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र वाहून साजरी करण्यात आली. त्यांनी प्रथम शिक्षण क्रांती करून, कृषक समाजाला शिक्षित केलं आणि भारतात कृषि क्रांती केली, तसंच रूढी परंपरावादी कृषक समाजाला नव्या प्रगत व्यवस्थेकडे नेलं. दरम्यान, शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी कृषीक्षेत्रात आमुलाग्र सुधारणा केली. विदर्भातील श्रीशिवाजी शिक्षण संस्थेमुळे समाजातील, तळागाळातील नागरिकांपर्यंत त्यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचविली. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान म्हणून, 'भारतरत्न' बहाल व्हावे यासाठी, पाठपुरवठा करणार असल्याची ग्वाही, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अमरावती इथं दिली. शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या ६०व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री बावनकुळे बोलत होते. डॉ.पंजाबराव देशमुख हॉस्पिटल इथं आजपासून रुग्णांच्या सेवेत, डायलीसिस मशीन सुरु करण्यात आल्या असून, याचे लोकार्पण, पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते झालं.

---------------------------------------------------

क्रिकेटचा समावेश

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथं होणाऱ्या, २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळानं काल याची घोषणा केली. ऑलिंपिकमध्ये २० षटकांचे सामने होणार असून, त्यात पुरुष आणि महिलांच्या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ प्रत्येकी १५ खेळाडू खेळवू शकणार आहे. मात्र, अद्याप यासाठी स्टेडियमच्या नावांची यादी ठरवण्यात आलेली नाही.

---------------------------------------------------

हवामान

प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तविलेल्या अंदाजानुसार येत्या काही तासात विदर्भातील वाशीम, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया आणि

नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी, विजांच्या कडकडाटासह, वादळ, ४०-५० किमी प्रतितास वेगानं सोसाट्याचे वारे आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असून, बाहेर जाताना काळजी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, आज सर्वाधिक कमाल तापमान, अकोला इथं ४३.७ अंश सेल्सिअस, तर नागपूरचे आजचे कमाल तापमान ४०.५ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. सध्या नागपुरात ढगाळ वातावरण असून हलक्या पावसाच्या सरी बरसण्याचा अंदाज आहे.

-----------------------------------------------------